आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – दु. ३.०० वाजता

७ ऑक्टोबर २०२३ – शनिवार

देशातल्या २० ते ३० वयोगटातल्या युवकांमध्ये वाढत असलेलं हृदयविकाराबद्दल राज्यपाल रमेश बैस यांनी चिंता व्यक्त केली आहे. हे प्रमाण आटोक्यात आणण्यासाठी हृदयविकार तज्ज्ञांनी मार्गदर्शन करावं असं आवाहन त्यांनी केलं. 'कार्डियाक इमेजिंग आणि क्लिनिकल कार्डिओलॉजी' या विषयावरच्या तिसऱ्या जागतिक परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी काल ते मुंबईत बोलत होते. इमेजिंग सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानासाठी लागणारी आधुनिक वैद्यकीय उपकरणे देशात तयार झाली तर इमेजिंग चाचण्यांचा खर्च कमी होईल, असं ते म्हणाले. हृदयरोग आणि  त्यासाठी लागणारा रोगनिदान खर्च आयुष्मान भारत सारख्या योजनेतून मिळाला तर त्याचा गरीब कुटुंबांना मोठा फायदा होईल असंही राज्यपाल म्हणाले.

<><><><><>

प्रसिद्ध कृषी शास्त्रज्ञ प्रोफेसर एमएस स्वामीनाथन यांनी कृषी क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दलच्या आठवणींना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आपल्या लेखातून उजाळा दिला. स्वामिनाथन यांनी केलेल्या कार्यामुळे भारताला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केलं असल्याचं मत मोदी यांनी व्यक्त केलं. देशानं एक दूरदर्शी व्यक्ती गमावला असून, ज्यांच योगदान नेहमीच सुवर्णाक्षरांनी कोरलं जाईल असं प्रधानमंत्री  मोदी यांनी आपल्या लेखामध्ये म्हटलं आहे.

<><><><><>

आरोग्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी राज्य शासनाने मोठा निधी उपलब्ध करून दिला असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज अकोला इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सर्वोपचार रूग्णालयातलं

दोनदिवसीय महाआरोग्य शिबिराचा शुभारंभ, तसचं शिवापूर येथील उपजिल्हा रूग्णालयाचे भूमिपूजन, बोरगाव मंजू येथील ग्रामीण रूग्णालयाचे भूमिपूजनाच्या आणि अकोला जिल्ह्यातील शहिदांच्या स्मारकाच्या उद्घाटन त बोलत होते.

अकोल्यातील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात येईल, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

यावेळी महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

उपमुख्यमंत्री अजित पवार आज नाशिकच्या दौऱ्यावर असून, ते वणी कडे जात असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी कांदे आणि टोमॅटो त्यांच्या मोटारी समोर फेकून ताफा अडवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तातडीने या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतलं. कांदा आणि टोमॅटोच्या घसरत्या भावाकडे लक्ष वेधण्यासाठी या कार्यकर्त्यांनी हे आंदोलन केलं.

**<><><><><>**

मुंबई पोलिसांनी मोठी कारवाई करत 300 कोटींचे दीडशे किलोपेक्षा अधिक अंमली पदार्थ जप्त केले आहेत. नाशिक रोडवरील शिंदे गाव एमआयडीसीमध्ये एमडी ड्रग्जच्या फॅक्टरीवर छापेमारी करून मुंबई पोलिसांनी ही कारवाई केली आहे. मुंबईसह देशाच्या वेगवेगळ्या भागातून बारा जणांना आत्तापर्यंत अटक केली असून, नाशिक ड्रग्जचा पुण्यातील ससून रुग्णालयातील ड्रग्ज प्रकरणाशी काही संबंध आहे का याचा तपास ही मुंबई पोलीस घेणार आहेत.

**<><><><><>**

गडचिरोली पोलिसांसमोर रजनी उर्फ कलावती समय्या वेलादी या महिला नक्षलवाद्यानं आज आत्मसमर्पण केलं. तिच्यावर ११ लाख रुपयांचं बक्षीस होतं. २००९ मध्ये छत्तीसगडमधल्या फरसेगड दलममध्ये ती भरती झाली होती. ४ चकमकी, १ खून आणि १ जाळपोळीच्या गुन्ह्याची तिच्या नावावर नोंद आहे. आत्मसमर्पण योजनेंतर्गत तिला साडेचार लाख रुपयांची मदत करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. २०२२ पासून आतापर्यंत १३ नक्षल्यांनी आत्मसमर्पण केल्याचे नीलोत्पल यांनी सांगितलं.

<><><><><>

जिल्हा वार्षिक योजनेतील निधीच्या खर्चाचं नियोजन फेब्रुवारी अखेर पर्यंत करुन आरोग्य विभागाची प्राथमिक आरोग्य उपकेंद्रं, प्राथमिक आरोग्य केंद्रं, ग्रामीण रुग्णालयं, उपजिल्हा रुग्णालयं ही व्यवस्था बळकट करण्याच्या सूचना वैद्यकीय शिक्षण मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी दिल्या आहेत. ते जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीत अध्यक्षपदावरुन बोलत होते. यावेळी त्यांनी शिक्षण, आरोग्य, कृषी, विशेष घटक योजना, काळमवाडी धरणाची गळती या विषयांचाही आढावा घेतला.

<><><><><>

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई स्पर्धांमध्ये चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रंकीरेड्डी या जोडीनं बॅडमिंटन दुहेरीमध्ये ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकलं. पुरुषांच्या क्रिकेट संघानंही अफगाणिस्तानला नमवून सुवर्णपदक मिळवलं. महिला आणि पुरुषांच्या संघानं कबड्डीमध्ये आणि ओजस देवतळे तसंच ज्योती सुरेखा

वेण्णम यांनी कंपाऊड तिरंदाजीमध्येही आज सुवर्णपदक पटकावलं. आतापर्यंत या स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंनी २८ सुवर्णपदकांसह एकूण १०३ पदकं जिंकली आहेत. राष्ट्रपदी द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या कामगिरीबद्दल खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे.